# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं./माध्य.-२२/ 3035
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक -०७/०३/२०२२

.प्रति,

मुख्याध्यापक ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- मंडळामार्फत मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या कालावधीबाबत..**

**संदर्भ :-** राज्यमंडळ पुणे यांचे जा.क्र.करामं/परीक्षा ३/१२६३ दि.०७/०३/२०२२ चे पत्र

मंडळामार्फत मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या कालावधीबाबतचे प्रकटन सोबत जोडण्यात आलेले आहे तरी सदर प्रकटनानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

(सत्यवान डी.सोनवणे),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

सोबत - राज्यमंडळ, पुणे यांचे दि. ०७/०३/२०२२ चे प्रकटन

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ॥ प्र क ट न ॥

**विषय:** मंडळामार्फत मार्च–एप्रिल २०२२ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी ) परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या कालावधीबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च–एप्रिल २०२२ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.१०वी ) परीक्षा दि.१५/०३/२०२२ ते दि.०४/०४/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

मार्च–एप्रिल २०२२ इ.१०वी व इ.१२वी च्या परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणाऱ्या विद्यार्थ्यांना विलंब शुल्क आकारण्यात येऊ नये/विलंब शुल्क माफ करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आदल्या दिवशीपर्यंत ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी असे शासनाने पत्र क्र.लवेसू–२०२१/प्र.क्र.९७/एसडी–२ दि.२८/१२/२०२१ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार सदर बाब सर्व संबंधित घटकांना विभागीय मंडळांमार्फत अवगत करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तथापि माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.१०वी ) परीक्षा माहे दि.१५/०३/२०२२ पासून सुरु होत असल्याने, सदर परीक्षेचे आवेदनपत्र नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि.१४/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंतच भरण्याची सुविधा उपलब्ध राहील, तदनंतर आवेदनपत्र भरणेसाठी संकेतस्थळ बंद करण्यात येणार आहे. सबब मार्च–एप्रिल २०२२ इ.१०वी परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नाव नोंदणीसाठी अर्ज केलेल्या, परंतु प्रस्तावामध्ये त्रुटी असणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि.१०/०३/२०२२ पर्यंतच त्रुटींची पूर्तता करुन, दि.१२/०३/२०२२ पर्यंत नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व उपरोक्त मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र भरावे.

उपरोक्तप्रमाणे सर्व मुख्याध्यापक, विद्यार्थी, शिक्षक, पालक व इतर संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४

दि. ०७/०३/२०२२